# नियमीत दिवाणी मुकदमा नं.४५/२०१२ मधील निशाणी १२५ वरील आदेश

(विठ्ठल दामोदर थळी, वगैरे वि. करंजा मच्छिमार सहकारी सो.लि.)

१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६, नियम–१७ प्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्याकरीता केला आहे. सदर अर्जाद्वारे प्रतिवादीने कैफियतीमध्ये प्रतिदावा नमूद करण्याकरीता कैफियत दुरुस्ती मागितली आहे.

२. सदर अर्जास वादी यांनी निशाणी १२८ कडे म्हणणे देवून हरकत घेतली आहे. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो त्यांना मंजूर नाही. प्रतिवादीने अर्जात नमूद केलेले दाव्यातील साक्षी पुराव्याबाबतचे कथन खोटे असून वादींचा पुरावा संपलेला आहे व तशी पुरावा संपल्याची पुरशीस वादींनी दिलेली आहे. वादींचे पुढे असे कथन आहे की, दि.०६.०५.१९८५ रोजीच्या साठेकराराप्रमाणे वादींना रक्कम मिळालेली नसल्यामुळे तसेच कायदेशीर बाबींमुळे सदरचा व्यवहार पूर्ण झालेला नाही. प्रतिवादी हे ३७ वर्षांनंतर दि.०६.०५.१९८५ रोजीच्या साठेकराराच्या अटीशर्तींबाबत कथन करत आहेत. प्रतिवादीकडून खरेदीखत करुन देण्याबाबत प्रतिदावा करण्याचे राहून गेले असून कैफियतीमधील उणीवा भरुन काढण्याकरीता त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला असून त्यास वादींची सक्त हरकत आहे.

३. वादींनी पुढे असे कथन केले आहे की, कैफियत परिच्छेद क्र. ११(अ) नंतर जो मजकूर प्रतिवादी नव्याने लिहू पहात आहे तसा मजकूर कैफियतीचे परिच्छेद क्र. ८ मध्ये नमूद आहे. प्रतिवादीने दि.०३.०३.२००९ रोजी कैफियत दाखल केली असून सुमारे १३ वर्षांनंतर ते कैफियतीत दुरुस्ती करुन मागत आहेत. तसेच त्यांनी प्रतिवादी कैफियतीत करु पहात असलेली दुरुस्ती ही बेकायदेशीर असून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

५. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत–**

६. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा दि.०६.०५.१९८५ रोजीचा साठेकरार रद्द करुन मिळणेकरीता प्रतिवादीविरुध्द दाखल केला आहे. त्यास प्रतिवादींनी निशाणी १० कडे दि.०३.०३.२००९ रोजी कैफियत दिलेली आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की,

प्रतिवादीने दि.०६.०५.१९८५ रोजीच्या साठेकराराप्रमाणे पूर्तता करुन व्यवहाराची संपूर्ण रक्कम वादींना दि.२४.०४.१९८७ पर्यंत अदा केली आहे. परंतु वादींनी साठेकरारातील अटीशर्तींची पूर्तता केलेली नाही. सदरचा दावा दाखल झाल्यानंतरही वादी हे प्रतिवादीला खरेदीखत करुन देतो असे आश्वासन देत होते. त्यामुळे सदर प्रतिवादीने त्याचे कैफियतीमध्ये बचाव घेतला आहे. परंतु, प्रतिवादीकडून प्रतिदावा दाखल करण्याचे अनावधानाने राहून गेले आहे. सदर प्रतिवादीने साठेकराराची पूर्ण रक्कम वादींना दिली असून प्रतिवादीचे नुकसान होवू नये म्हणून प्रतिवादी हे कैफियतीत अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करुन मागत आहेत.

७. प्रतिवादीने कैफियतीतील परिच्छेद ११ नंतर ११अ मधील मजकूर, कैफियत कलम १३ नंतर १३अ व १६ब मधील मजकूर नमूद करण्याबाबत विनंती केली आहे.

८. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादीने मागितलेली दुरुस्ती ही दाव्यातील मुद्दे निश्चितीच्या नंतरची आहे. सदर दुरुस्तीने प्रतिवादी हे दाव्यास प्रतिदावा दाखल करु पहात आहेत. तसे झाल्यास वादींना प्रतिदावास कैफियत देवून त्याबाबत म्हणणे मांडता येणार आहे. प्रतिवादीने मागितलेली कैफियत दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान असलेल्या वादातीत मुद्दयांबाबत असून दावा गुणदोषावर निकाली करण्याच्या दृष्टीने महत्वाच्या असल्याने सदरची कैफियत दुरुस्ती मंजूर करणे योग्य होईल.

९. सदरचा प्रतिवादीचा कैफियत दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस कैफियतीत आवश्यक असलेला मजकूर नमूद केल्यास व प्रतिदावा दाखल केल्यास दावा गुणदोषांवर न्यायनिर्णीत करणेस मदत होणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही किंवा दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. परंतु प्रतिवादीने कैफियत दुरुस्ती मागण्यास विलंब केला आहे. त्यामुळे सदरचा दुरुस्ती अर्ज हा प्रतिवादीवर खर्च आकारुन मंजूर केल्यास योग्य होणार आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून प्रतिवादीवर खर्च आकारुन सदर कैफियत दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. सबब, वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक १ साठी होकारार्थी मत नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक २ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादीचा अर्ज रु.२०००/- इतक्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी यांनी सदर खर्चाचे रक्कमेपैकी रु.१५००/- इतकी रक्कम वादी यांना पुढील तारखेचे आत द्यावी. |
| ३. | प्रतिवादी यांनी सदर खर्चाचे रक्कमेपैकी रु.५००/- इतकी रक्कम तालुका विधी समिती, उरण यांचेकडे पुढील तारखेचे आत जमा करावी. |
| ४. | प्रतिवादीने खर्चाची रक्कम भरल्यानंतर विहीत कालावधीत कैफियतमध्ये योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ५. | प्रतिवादीने दुरुस्त कैफियतीची प्रत न्यायालयासाठी व वादींसाठी दयावी. |

WALI NILESH MALAKAPPA
Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA
Date: 2023.01.19 10:59:18 +0530

ठिकाण – उरण
दिनांक: १८/०१/२०२३

( निलेश एम. वाली )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.